तरुण भारत ■ गुरुवार, १६ जानेवारी २०२०

# हळबे महाविद्यालयात अन्नमहोत्सव कार्यक्रम



**दोडामार्ग : येथील हळबे महाविद्यालयात अन्नमहोत्सव कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.**

वार्ताहर

दोडामार्ग

येथील लक्ष्मीबाई सीताराम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे अन्न महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी विविध पदार्थ तयार करून स्पर्धेत सहभाग घेतला. उद्घाटन कसई-दोडामार्गच्या नगरसेविका आदिती मणेरीकर यांच्या हस्ते झाले. प्राचार्य एस. यू. दरेकर यांनी स्वागत केले. प्रा. एस. एन. जाधव यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेचा हेतू कथन केला. प्रा. एस. एस. पाडगावकर यांनी प्राचार्य डॉ. दरेकर यांचे स्वागत केले. परीक्षक म्हणून चेतन गुळळेकर व रोहन बागकर यांचे प्राचार्यांनी स्वागत केले. प्रत्येक वर्गनिहाय विद्यार्थ्यांनी बनवलेल्या रुचकर स्वादिष्ट पदार्थांमधून क्रमांक काढण्यात आले. यात प्रथम क्रमांक स्नेहल परब, नेहा नांदोडकर व रामचंद्र पिळणकर या तृतीय वर्ष कलेतील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या छोले मसाला या पदार्थाला मिळाला. द्वितीय क्रमांक तृतीय वर्ष कला वर्गातीलच कृतिका पोकळे, आसावरी मणेरीकर, समीर ठाकुर यांनी मिळविला. तृतीय क्रमांक अंकिता धर्णे, तृतीय वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला. उत्तेजनार्थ स्वाती नाईक, सुभाष गवस, अनिशा धर्णे आदींना देण्यात आले. विद्यार्थ्यांनी या पदार्थांचा आस्वाद घेतला. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यासाठी प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. प्रा. पाडगावकर यांनी आभार मानले.

**स्नेहल, नेहा, रामचंद्र यांनी पटकावला प्रथम क्रमांक**

Scanned by CamScanner